# प्रेसनोट

## बेकायदेशीररित्या ०३ देशी बनावटीसारखे अग्निशस्त्रे व १२ जिवंतकाडतूसे बाळगणा-या २ गुन्हेगारास ॲन्टीगुंडा स्कॉड (उत्तर) पथकाकडून अटक

दिनांक ०८/०६/२०१६ रोजी संघटित गुन्हेगारी विरोधी पथक,उत्तर प्रा.विभाग,गुन्हे शाखा पुणे शहर कडील पोनि श्री.मिलिंदगायकवाड व स्टाफ असे चिखली परिसरात भाजी मंडई चौक कृष्णा नगर येथिल भागात पेट्रोलिंगकरित असताना, पोनि श्री मिलिंदगायकवाड यांना मिळाले बातमीवरुन अष्ठविनायक चौक, मोरे वस्ती,चिखली, ता.हवेली जि.पुणे येथिल शिव पान स्टॉलचे समोर सापळा लावुन रेकॉडवरिल गुन्हेगार नामे १.विशाल नागुगायकवाड ऊर्फगिडया वय- ३१ वर्षे रा.गट क्र.१८१२,शिव पार्वती हाऊसिंग सोसायटी, म्हेत्रे वस्ती, चिखली, ता.हवेली जि.पुणे व त्याचा साथिदारनामे २.राहुल प्रमोद साळवी वय-३६ वर्षे रा.महात्मा फुलेनगर,झोपडपटटी मोहन नगर,पिंपरी पुणे यांना पकडुन**अ.नं १ याचेकडुन२ देशी बनावटीचे पिस्टलव १० जिवंतकाडतुसेतसेच अ.नं २ याचेकडुन १ रिव्हॉलवर व २ जिवंतकाडतुसे अशीएकुणकिं रुपये ९०,७००/- ची अग्निशस्त्रे** जप्तकरुन सदर दोन्ही आरोपींविरुध्दनिगडी पोलीस स्टेशन येथे भारतीय हत्यार कायदाकलम ३(२५), महाराष्ट्र पोलीस अधिनियमकलम ३७ (१) सह १३५ प्रमाणे गुन्हा दाखलकरण्यात आलेला आहे.

**अटक आरोपी पैकी अ.नं १ विशाल गायकवाड याचेविरुध्द यापुर्वी पिंपरी ५ ,हिंजवडी ०१ देहुरोड ०२ ,या पोलीस स्टेशनलाखून मारामारी असे शरिराविरुध्दचे व बेकायदेशिर अग्नीशस्त्रे बाळगल्याचे गुन्हे दाखल आहेत.**

सदरचीकारवाई ही मा. पोलीसउप आयुक्त,सायबरसेल श्री दिपक साकोरे, मा. पोलीसउप-आयुक्त, गुन्हे, पी.आर.पाटील, मा. सहा पोलीस आयुक्त, गुन्हे-२ श्री अरुण वालतुरे, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीसनिरीक्षक श्री मिलिंदगायकवाड, स.पो.नि. रणजित भोईटे, कर्मचारी - राजेंद्र मोरे, विष्णु पांडुळे, नागेश भोसले, अब्दुल सय्यद, रमेशभिसे, राजेंद्रशिंदे, कांतीलाल बनसुडे,दिनेश साबळे,दत्ता फुलसुंदर,सलिम पठाण,शितलशिंदे,नवनाथचांदणे,रमेशचौधर यांनीकेली आहे.

